साक्षीदाराचा पुरावा जालना न्यायालयामधून व्हीडीओ कॉन्फरसींगव्दारे नोंदविण्यात आला.

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यांचे कार्यालय यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ८८/२०२४**
**निशाणी क्र. २५**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण** **सरकारी अभियोक्ता**

**..वि..**

किशोर लक्ष्मण इंगळे + ३ **आरोपी.**

| | |
|---|---|
| शासन तर्फे साक्षीदार क्र. ५ | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | भिवराज लालोजी घोगरे |
| वय अंदाजे ५७ वर्षे | धंदा– नौकरी, कनिष्ठ अभियंता, वरिष्ठ भुवैज्ञानीक यांचे कार्यालय, जालना, जि. जालना. |
| राहणार | जालना, जि. जालना. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

सन २०२३ मध्ये मी कनिष्ठ अभियंता या पदावर वरिष्ठ भुवैज्ञानीक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, यवतमाळ येथे कार्यरत होतो. दिनांक १/११/२०२३ रोजी ग्रामीण पोलीस स्टेशन, यवतमाळ यांनी माझ्या वरिष्ठांना एक पंच मिळण्याबाबत पत्र पाठविले होते. त्यानूसार वरिष्ठांनी मला पंच म्हणून नियुक्त केल्याबाबतचे पत्र पोलीसांना पाठविले व त्याची प्रत मला दिली. ते पत्र मला दाखविले असून, ते तेच आहे व **ते पत्र निशाणी क्रमांक २६ वर आहे**. त्यानूसार मी ग्रामीण पोलीस स्टेशन, यवतमाळ येथे गेलो. त्यानंतर फिर्यादीसोबत व पोलीसांसोबत मी किन्ही येथील सभेच्या ठिकाणी गेलो. घटनास्थळ हे फिर्यादी संदिप मेहत्रे याने दाखविले. घटनास्थळ हे सभा मंडपाच्या समोरच्या भागातील शेवटी होते. पोलीसांनी तेथे घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. दुसरा पंच श्री गिरी हे त्यावेळी तेथे हजर होता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला, त्यावर माझी, दुसरा पंच व पोलीसांची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व तो निशाणी क्रमांक २१ वर आहे.

**<u>उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. पि.पि.किर्दक यांचे मार्फत सुरु –</u>**

३. मी सकाळी ९.४५ वाजता कार्यालयामध्ये जातो. कार्यालयामध्ये गेल्या बरोबर मला हजेरी लावावी लागते. माझ्या कार्यालयामध्ये ***हलचल रजिष्टर*** आहे. हे म्हणणे खरे आहे की मला कार्यालयाच्या बाहेर जावयाचे असल्यास त्याची नोंद तसेच ज्या कामासाठी बाहेर जावयाचे आहे त्याची नोंद मला ***हलचल रजिष्टरमध्ये*** नोंद करावी लागते. दिनांक १/११/२०२३ रोजी मी माझ्या कार्यालयामध्ये हजर असल्याबाबतच्या रजिष्टरची तसेच हलचल रजिष्टरची प्रत मी पोलीसांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की दिनांक १/११/२०२३ रोजी मी कर्तव्यावर हजर नव्हतो.

४. हे म्हणणे खरे आहे की मला पंच म्हणून नेमल्याच्या कथित पत्रावर ते पत्र मला मिळाल्याची पोच घ्यावी लागते. ती पोच मी पोलीसांना दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी जेव्हा पोलीस स्टेशनला गेलो होतो तेव्हाच पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा अगोदरच तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की पोलीस स्टेशनलाच मी पंचनाम्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी पोलीस स्टेशनला घटनास्थळ पंचनामा मला वाचून दाखविला नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की घटनास्थळ पंचनामा मी अगोदर वाचला व नंतर घटनास्थळावर सही केली. घटनास्थळ पंचनामा कोणत्या पोलीस अधिका–याने किंवा कोणत्या कर्मचा–यांनी तयार केला, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळावर गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की मी घटनास्थळावर गेलो व तेथे वाचून पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की मी पोलीसांच्या तसेच माझ्या वरिष्ठांच्या सांगण्यावरुन पोलीस स्टेशनमध्ये सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की फिर्यादीने घटनास्थळ दाखविले. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–**

५. घटनास्थळ पंचनामा कोठे तयार करण्यात आला होता, हे मला माहित नाही.

**उलटतपास–नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

(पी.एस.इंगळे)

दिनांक – १४/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.